जैविक वैद्यक कचरा (BMW) बाबत
जिल्हास्तरीय समिती स्थापन स्थापन
करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
तारीख: ०४ एप्रिल, २०१९.

<u>वाचा :</u>

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः संकिर्ण २०१७/प्र.क्र. ४४/आरोग्य ३, दिनांक १३.०४.२०१९.**

२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः संकिर्ण २०१७/प्र.क्र. ४४/आरोग्य ३, दिनांक ०९.०१.२०१९.**

परिपत्रक

जैव वैद्यकीय कचरा अधिनियम,२०१६ मधील नियम ११(११) नुसार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम,२०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती कामकाज पाहिल असे या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन स्थापन करणे आवश्यक असल्याने यासंदर्भात सर्व जिल्हाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम,२०१६ अंतर्गत जिल्हास्तरावर कामकाज पाहण्यासाठी सर्व जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यात पुढीलप्रमाणे समिती स्थापन करावी.

समिती :-

१)	जिल्हाधिकारी	- अध्यक्ष
२)	जिल्हा शल्यचिकित्सक	- सदस्य
३)	जिल्हा आरोग्य अधिकारी	- सदस्य
४)	उप आयुक्त, महानगरपालिका	- सदस्य
५)	मुख्य आरोग्य अधिकारी, महानगरपालिका	- सदस्य
६)	प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदुषण नियंत्रण मंडळ	- सदस्य सचिव
७)	इंडीयन मेडीकल असोशिएशन	- प्रतिनिधी

२. समितीची कार्यकक्षा:-

१) जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम,२०१६ अंतर्गत नियमांची जिल्हास्तरावर योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.

२) समितीची त्रैमासिक बैठक घेणे.

३) मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट -१९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

४) खाजगी व शासकीय रुग्णालयाचा जैविक वैद्यकीय कचरा (BMW) नोंदणीबाबत आढावा घेणे.

५) रुग्णालयांत किती जैविक वैद्यक कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबाबत आढावा घेणे.

६) जैविक वैद्यक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी Common Treatment & Desposal Facility याचा आढावा घेणे.

७) जैविक वैद्यक कचरा बाबत शासकीय व खाजगी रुग्णालयांच्या अडीअडचणी जाणून घेणे.

८) जैविक वैद्यक कच-याच्या साठवणूक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाययोजनांबाबत उपाय सुचविणे व अंमलबजावणी करणे.

९) क्षेत्रिय भेटी देऊन पाहणी करणे.

१०) जैविक वैद्यक कचरा बाबत इतर अनुषंगिक बाबींवर चर्चा व निर्णय घेणे.

समितीने आपला अहवाल सर्व दरमहा संबंधीतांना सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०२१०४६२२७०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.04.04 15:45:31 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, (आरोग्य), यांचे स्वीय सहायक.
४. अपर मुख्य सचिव, (पर्यावरण विभाग)यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, (नगर विकास) यांचे स्वीय सहायक.
६. प्रधान सचिव, (प.दु.म.) यांचे स्वीय सहायक.
७. आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१०.संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई.
११.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१२.प्रधान वैज्ञानिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१३.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन), मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१४.संचालक, नागरी प्रशासन, पुणे.

१५. अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोशिएशन,मुंबई.
१६.अध्यक्ष, असोशिएशन ऑफ हेल्थ प्रोव्हायडर्स, मुंबई
१७.मे.पॉस्को इनव्हायरनमेंटल सोल्युशन,पुणे
१८.मे.महाराष्ट्र बायो-हायजेनिक,लोटे,खेड
१९.जन आरोग्य अभियान,पुणे
२०.सेहत,मुंबई
२१.संचालक,राष्ट्रीय जैव आयुर्विज्ञान संस्था,पुणे
२२.निवडनस्ती (कार्यासन आरोग्य ३).